ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.VII/Jan 2012pp.1-4

Research Paper

'' नॅचरल शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रिज लि. रांजणी साखर – काखान्याच्या उस उत्पादन व साखर उत्पादन प्रवृत्तीचा अभ्यास''

प्रा. डॉ. विकास ज. पवार
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
सी.के. गोयल महाविद्यालय, दापोडी,
पुणे – 12

प्रस्तावना :–

भारत हा कृशीप्रधान देश आहे. आजही 58टक्के लोकांची उपजिविका शेतीवर अवलंबुन आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्वाचें स्थान आहे. या ग्रामीण अर्थव्यवस्थेतचा पाया हा शेती व्यवसाय आहे. महाराश्ट्राते विशेशतः पश्चिम महाराश्ट्रात साखर उद्योगाचे मोठे गाळे आहे या साखर कारखान्या भोवती या भागाचे राजकराण फिरत आहे. त्यादृश्टीने महाराश्ट्रा साखर उद्योगात महत्व प्राप्त झले. आहे. आधुनिक काळात उसाचा उत्पादन खर्च वाढत आहे त्यामुळे उस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य किंमत देण्यासंदर्भात शेतकऱ्याना आंदोलने करावे लागत आहेत. या बदलत्या परिस्थितीमंध्ये ऊस उत्पादन व साखर उत्पादन प्रवृत्ती कशी आहे याचा अभ्यास जास्त उपयुक्त आहे.

प्राचिन काळापासून भारतीयांना ऊसाची लागवड कशी करावी आणि त्याचा रस काढून गुळ व साखर तयार करण्याची प्रक्रिया माहिती होती. भारातातून ऊसाचा जगभर प्रसार झाला आहे 6 व्या शतकात अरबांनी भारतातून इराणमंध्ये ऊस नेला. व तेथूनच त्याचा प्रसार इजिप्त, मारोस्को, स्पेन, सिसिली या देशात झाला. पुढे अनेक देशात ऊसाची लागवड झाली आहे. आज ऊसापासून साखर उत्पादन करणारे जगात जवळपास 84 देश आहेत. या 84 देशात भरताचा पहिला क्रमांक लागतो. भारतात पहिला साखर कारखाना हुगळी येथे इ.सन. 1784 साली सुरु झाला. तो खाजगी मालकीचा होता. या कारखान्यातून तयार झालेली, रम इस्ट इंडिया कंपनीला पुरविली जात असे. 1903 साली भारतात एकच साखर कारखाना होता. त्यानंतर 1906 साली दोन, 1910 साली तीन व 1920 ली 19 साखर कारखाने अस्तीत्वात आले. 1950–51 मध्ये साखर कारखान्यांची संख्या 138 झाली होती.

महाराश्ट्र ऊस उत्पादनाच्या दृश्टीने महत्वाचे राज्य आहे. महाराश्ट्रात पहिला साखर कारखाना 1920 साली अहमदनगर जिल्हयात बेलापुर येथे सुरु झाला. 1950 साली अहमदनगर जिल्हयातील लोणी या गावी पहिला सहकारी साखर कारखाना उभारला. 1950 – 51 ला खाजगी व सहकारी मिळून एकूण 13 कारखाने होते. 2005 – 06 मध्ये सहकारी साखर कारखाने 166 तर खाजगी कारखाने 19 असे मिळून 185 साखर कारखाने कार्यरत होते. महाराश्ट्रातील मराठवाडा विभागत 2005 – 06 मध्ये 52 साखरकारखाने होत. या 52 साखर कारखान्यापैकी 8 साखर कारखाने खाजगी होते. त्यातील तीन साखर कारखने एकटया उस्मानाबाद जिल्हयातील आहेत. त्यातील नॅचरल शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रिज लि. रांजणी ता. कळंब हा पहिला खाजगी कारखाना आहे.

उद्दिष्टे –

1) नॅचरल शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. या कारखान्याची गाळप क्षमता व कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादन यांचा अभ्यास करणे

2) नॅचरल शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. या साखर कारखान्याने गाळप केलेले ऊस. साखर उप्तादन व साखर उतारा यांच्या प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

संशोधन पध्दती –

नॅचरल शुगर ॲन्ड अलाईड लि. रांजणी या साखर कारखान्याने गाळप केलेला ऊस, साखर उत्पादन व साखर उतारा इ. प्रवृत्तीचा अभ्यास करण्यासाठी द्वितीयक सामुग्रीचा वापर केला आहे. यासाठी साखर कारखान्याचे वार्शिक अहवाल. महाराश्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ वार्शिक अहवाल यांचा वापर केला आहे.

महाराश्ट्रातील पहिला खाजगी साखर कारखान्याचा मान नॅचरल शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. रांजणी या कारखान्याकडे जातो. उस्मानाबाद जिल्हयातील कळंब तालुक्यातील रांजणी या गावी दिनांक 4 जानेवारी 1999 रोजी श्री. बी.बी. ठोंबरे यांनी या कारखान्याची निर्मिती केली. 1999 ते 2000 मध्ये या कारखान्याने एकूण 53161.12 मे.टन ऊस गाळप केले होते. हेच प्रमाण 2006–07 ला 3,76,980,00 मे. टन इतके वाढलेले आढळते.

तक्ता क्रमांक १

उस गाळप,साखर उत्पादन व साखर उतारा प्रवृत्ती

अ.न	वर्ष	गाळप केलेलाऊस (मे.टन)	साखर उत्पादन (क्विंटल)	साखर उतारा
१	१९९९–२०००	५३,१६९.१२	५,१७०	९.५३
२	२०००–०१	२,८७,६८४.१९५	३,५०,१५०	१२.१७
३	२००१ – ०२	३,४७,७३१.०६५	४,२७,११०	१२.३०
४	२००२–०३	३,४४,८२५.४१५	३,९५,०००	११.४५
५	२००३–०४	२,४०,५७७.६८०	२,६२,९००	१०.९३
६	२००४–०५	२,०१,३६५.२१५	२,१४,३५०	१०.६१
७	२००५–०६	३,६१,६१५.१८५	३,६९,१००	१०.२०
८	२००६–०७	३,७६,९८०.०००	४,६१,२७०	१२.२३

आधार – साखर कारखान्याचे वार्षिक अहवाल.

वरिल तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सन 1999–2000 या वर्शी कारखान्याचा पहिला गळीत हंगाम सुरु झाला. या हंगामात एकुण 5,3169.12 मे. टन इतका ऊस गाळप केला गेला. व त्यापासून 50,177 क्विंटल साखरेचे उत्पादन करण्यात आले. या वर्शी साखरेचा उतारा 9.55 इतका होता. तर सन 2006 – 07 मध्ये कारखान्याने एकून 3,76,980 मे. टन ऊस गाळप केला. त्यापासून 4,61,270 क्विंटल साखर उत्पादीत केली होती. यावर्शी साखर उतारा 12.23 इतका होता. तो मागील वर्शाच्या तुलनेत 2.03 इतका जास्त असलेला दिसून येतो. तुलनेने साखर उतारा चांगला असल्यामुळे कारखाना फायद्यात चालला आहे. त्यामुळे या कारखान्याने शेतकऱ्यांना ऊसाचा भाव चांगला दिला आहे. 1999–2000 या वर्शी प्रतिटन 650 रुपये भाव देण्यात आला तोच 2006–07 मध्ये 1150 रुपये इतका भाव दिलेला आहे. त्याचबरोबर याच काळात प्रतिहेक्टरी ऊस उत्पादन 12.26 मे. टनावरुन 39.88 मे. टनापर्यंत वाढले आहे. मध्यंतरीच्या

काळात हे उत्पादन 55.07 मे. टनापर्यंत पोहचले होत.

नॅचरल शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. या कारखान्यात साखर उत्पादनाबरोबर इतर उपपदार्थाचे उत्पादन देखील घेतले जाते. त्यात प्रामुख्यान सन 2002 मध्ये सहा मेगावॅट शमतेचा विजनिर्मीतीचा प्रक्प सुरु केला व या प्रक्लपासून 12 महिने विज निर्मिती केली जाते. 2003 मध्ये या कारखान्याने फेरोअलाईज स्टील प्रकल्पाची उभारणी केली. खनिजापासून लोखंड तयार करण्यासाठी लागणारा मुळ धातू फेरोअलाईज या पदार्थाची निर्मिती येथे केली जाते. सुरवातीस प्रतिदिन 40 मे. टन इतके उत्पादन केले जात होते. ते 2004 – 05 मध्ये 80 मे. टन इतके वाढले आहे. तसेच 2005 मध्ये गांडुळ खत व गांडुळ बिज निर्मिती प्रकल्पाची सुरुवात केली आहे. या साठी महाराश्ट्रशासनाकडून अर्थसाह्य प्राप्त झाले आहें. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना गांडुळखताच्या वापरास प्रेरणा मिळाली आहे. त्या मुळे ऊस उत्पादकतेत वाढ होत आहे.

पाणी टंचाईवर मात करण्यासाठी या कारखान्याने ऊसातील पाण्याचा वापर करण्याचा प्रयोग केला आहे. त्यासाठी यंत्रणा चालु केली. या यंत्रणेत उसाच्या रसातील पाणी बाश्पीभवन होऊन जे वाया जाते त्या वाफेला थंड करुन त्या वाफेचे पुन्हा पाण्यात रुपांतर केले जाते. व ते पाणी कारखाना चालवण्यासवाठी वापरात आणले जाते. महाराश्ट्रशासनाकडून इथेनॉल निर्मिती प्रक्लप उभारण्याचा परवाना घेवून डिसेंबर 2006 अखेर या प्रक्लपाची उभारणी पुर्ण केली आहे. या प्रक्लपासाठी कारखान्यानें जवळ पास 14 कोटी रुपये भांडवल गुंतवले आहे. येथे मळी व उसाचा रस या वर प्रक्रिया करुन ईथेनॉलची निर्मिती केली जाते. इथेनॉल प्रकल्पाला जोडून नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. या कारखान्याने 2006 – 07 पासून 10 मे. टन शमतेचा मिनी बायोडिझेल प्रकल्प उभारला आहे. दररोज 6.5 हजार लिटर बायोडिझलची निर्मिती केली जात आहे.

निष्कर्ष –

1) नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. साखरकारखान्याची सुरवातीस दैनंदिन गाळप क्षमता 1500 मे. टन ऐवढी होती. त्यात वाढ होवून 2007 – 08 मध्ये हि गाळप क्षमता 3500 मे. टन इतकी केली आहे.

2) नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि कारखान्याची जेवढी गाळप क्षमता आहे. त्या पेक्षा कमी क्षमतेचा वापर केलेला आढळतो. . सरासरी 88.2 टक्के क्षमतेंचा वापर केलेला दिसून आला आहे.

3) या कारखना क्षेत्रातील उस उत्पादनात उच्चांक गाठलेला आहे. प्रति हेक्टरी ऊस उत्पादन 55.06 मे.टन ते 39.88 मे. टन या दरम्यान राहिले आहे.

4) या कारखान्याने उत्पादित केलेल्या साखरेचा सरासरी उतारा 11.03 इतका राहिला आहे.

5) या कारखान्यानें साखरे शिवाय इतर अनेक उप उत्पादने सुरु केल्यामुळे हा कारखाना कायम फयादयात चाललेला आहे.

शिफारशी –

1) साखर कारखान्याने आपलया गाळप क्षमतेंचा 100 टक्के वापर केला पाहिजे. त्यासाठी कारखान्याने आपल्या कार्यक्षेत्रात ऊस उत्पादन वाढीवर भर देणे गरजेचे आहे.

2) शेतकऱ्यांना नेहमी ऊसाची योग्य किंमत दिल्यास शेतकरी ऊसाचे जास्तीत जास्त उत्पादन घेण्यास प्ररीत होतील व त्यामुळे कारखान्याला मुबलक ऊसाचा पुरवठा होईल.

3) कारखान्यात प्रशिक्षीत, शैक्षणिक पात्रता धारक कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जावी. जेणेकरुन कारखान्यांची कार्यक्षमता वाढेल.

4) स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी कारखान्याने कार्यक्षमता प्रशासकीय व्यवस्थापन, अर्थिक शिस्त, ऊस उत्पादकतेत वाढ, साखर उतारा वाढविणे या बाबींचे योग्य व्यवस्थापन केलयास कारखाना अधिक फियदयात व कार्यक्षम रित्या चालेल.

संदर्भ –

1) दत्त एन.एल. इंडियन फार्मिंग इन शुगरकेन कल्टीव्हेंशन, बॉम्बे स्टेट प्रकाशन, मुंबई

2) खर्चे आर.एम. शुगर को. ऑपरेटिव्ह इन डेव्हलपिंग्र इकॉनॉमी, परिमल प्रकाशन औरंगाबाद.

3) महाराश्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संध लि. मुंबई.

4) नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड लि. रांजणी साख्र कारखाना वार्शिक अहवाल.